महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
Email : eooandm@mahadiscom.in
Website : www.mahadiscom.in

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.१२/२५८१८
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
दुरध्वनी क्रमांक : ०२२- २४०७७४४१
फॅक्स क्रमांक ०२२-२४०२५७६३
दिनांक : १६/०८/२०१०

# प रि प त्र क

विषय : लोकनेते राजाराम बापू पाटील हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, इस्लामपूर, सांगली या रुग्णालयाच्या दरसुचीला मुदतवाढ देण्याबाबत.

संदर्भ : १) सा.आ. क्र.२० (क) दि. १७.०६.१९६३.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.११२ दिनांक ०७.०६.२००७

.....

महावितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांना अस्थिविकार (उपचार/शस्त्रक्रिया), मेंदूचे विकार, मणका व खुबा यावरील उपचार व शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी सा.आ.क्र.२० (क) दिनांक १७.०६.१९६३ मधील तरतुदीनुसार प्रशासकीय परिपत्रक क्र.११२ दि.०७.०६.२००७ अन्वये लोकनेते राजाराम बापू पाटील हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, इस्लामपूर, सांगली या रुग्णालयास महावितरण कंपनीच्या मान्यताप्राप्त सूचीवर समाविष्ट करण्यात आले होते. तथापि, सदर रूग्णालयाकडून सादर करण्यात आलेले दर हे दिनांक ०७.०६.२००७ ते दिनांक ०६.०६.२०१० पर्यंतच अंमलात होते. सदर रुग्णालयाने सादर केलेल्या दरांना मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. आता सक्षम अधिकाऱ्यांनी, लोकनेते राजाराम बापू पाटील हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, इस्लामपूर, सांगली या रुग्णालयाने सादर केलेल्या नवीन दरसुचिला तीन वर्षांकरिता म्हणजेच ०७.०६.२०१० ते ०६.०६.२०१३ या कालावधीकरिता मान्यता दिली आहे.

३. दि.०७.०६.२०१० नंतर सदर रुग्णालयामध्ये उपचार/शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या महावितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांना नियमानुसार दरसुचीच्या मर्यादेच्या अधीन राहून वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

४. प्रशासकीय परिपत्रक क्र.११२ दि.०७.०६.२००७ मधील इतर अटी व तरतुदी अबाधित राहतील.

महाव्यवस्थापक (क)

प्रति
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे विभागीय कार्यालयापर्यंत.